दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र ● गुरुवार दि.६ मार्च २०२५ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-१३० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## या महाराष्ट्राला कोणाची तरी दृष्ट लागली

**मुंबई**–राष्ट्रवादीचे नेते व माजी मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत बोलताना राज्यपालांच्या अभिभाषणाचे स्वागत केले आहे. तसेच यावेळी मुख्यमंत्र्यांना त्यांनी महाराष्ट्र व कर्नाटक सीमाप्रश्नावर तोडगा काढण्याची विनंती केली आहे. तसेच महाराष्ट्रात सुरू असलेल्या गुन्हेगारीवरून छगन भुजबळ यांनी जोरदार हल्लाबोल केल्याचे पाहायला मिळाले.

छगन भुजबळ यांनी पुढे बोलताना महाराष्ट्रात सुरू असलेल्या गुन्हेगारीवर देखील भाष्य करताना हल्लाबोल केला आहे. छगन भुजबळ म्हणाले, मागच्या काही दिवसांत महाराष्ट्रात ज्या घटना घडत आहेत, खरेतर संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. यंत्राचा, तंत्राचा, मंत्राचा हा महाराष्ट्र आपण म्हणतो. संतांचा हा महाराष्ट्र ज्ञानेश्वरांपासून तुकरमांपर्यंत. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते संभाजी महाराजांचे पोवाडे आपण गातो, तो आपला हा महाराष्ट्र. या महाराष्ट्राला कोणाची तरी दृष्ट लागली.काही महिन्यातले काही प्रकरणे आहेत. बीडचे प्रकरण संतोष देशमुख, ते तर पहावत नाही. त्याचा आपण सगळ्यांनी निषेध केला, जी काही कठोर शिक्षा व्हायला पाहिजे ती झालीच पाहिजे.

# सोबत राहणाऱ्यांवर लक्ष ठेवा,गैर काम करणाऱ्यांना दूर ठेवा-अजित पवार

## मंत्री,आमदारांसह पदाधिकाऱ्यांचा मुंबईत घेतला विशेष शिकवणी वर्ग

**मुंबई (वृत्तसंस्था)**

सरपंच हत्या प्रकरणात निकटवर्तीयच गुंतल्याने धनंजय मुंडेंना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर देवगिरी बंगल्यावर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी आपल्या पक्षाचे मंत्री, आजी-माजी खासदार, आमदार, जिल्हाध्यक्षांची बैठक घेतली. आपल्यासोबत राहणाऱ्यांवर लक्ष ठेवा, तो काय काम करतो हे पाहा, त्याचे चारित्र्य तपासा, गैर-चुकीची कामे करणाऱ्यांना दूर ठेवा. महायुतीच्या आमदारांशी समन्वय साधून स्थानिक पातळीवर कामकाज करा, असा शिकवणी वर्ग त्यांनी घेतला. महामंडळापासून तर विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येक ठिकाणी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संधी मिळेल, असेही त्यांनी सांगितले. मंगळवारी रात्री झालेल्या या बैठकीस प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेही उपस्थित होते.विधिमंडळाच्या प्रमुख समित्यांमध्ये ५०:२५:२५ असा फॉर्म्युला राहील असेही पवारांनी सांगितल्याचे समजते. भाजपला ५० तर शिवसेना व राष्ट्रवादीला २५:२५ याप्रमाणे समित्यांवर प्रतिनिधित्व मिळणार आहे.मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना शासकीय समित्यात महत्त्वाची जबाबदारी देण्याचे ठरवले आहे. लवकरच महामंडळापासून तर विशेष कार्यकारी अधिकारी पदासाठी नियुक्ती होईल. मित्रपक्षाचा आमदार असणाऱ्या ठिकाणी त्यांना ५० टक्के तर अन्य दोन पक्षांना २५:२५ टक्के याप्रमाणे पदांचे वाटप होईल. या नियुक्त्या लांबणार नाहीत, असेही पवार म्हणाले.पुढील काही दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये सभासद नोंदणीसाठी सर्व पदाधिकारी तसेच आजी-माजी आमदारांनी प्रयत्न करावे अशी सूचना पवारांनी केली. बंडखोरी करून महायुतीमधून अन्य पक्षांमध्ये गेलेल्यांना सामावून घेतले जाणार आहे. तेव्हा स्थानिक पातळीवरच्या वादाचे कंगोरे उद्भवता कामा नये अशी तंबीदेखील पवारांनी दिल्याचे पदाधिकाऱ्यांनी खासगीत सांगितले.



## कोळगाव मध्ये ग्रामस्थान साठी छावा चित्रपट प्रसारित

**श्रीगोंदा । गणेश गाडेकर**

पूर्वीच्या काळी ग्रामीण भागात मनोरंजनासाठी पडद्यावर चित्रपट तेही गणपती च्या वेळी पाहावंयास मिळत असे त्यानंतर घरो घरी टीव्ही आले व आता मोबाईल आले त्यामुळे लोक एकत्र नं येता दुरावली गेली परंतु खूप दिवसांनी कोळगाव मधील तरुणांनी एकत्र येत ओंकार नलगे मित्र परिवार व बजरंग दल, ग्रामपंचायत कोळगाव यांनी एकत्रित येऊन छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावरील छावा चित्रपट हा प्रदर्शित केला यामुळे गावातील ग्रामस्थ खूप दिवसांनी चित्रपट पाहण्यासाठी एकत्र आले या मध्ये कित्येक ग्रामस्थ हे चित्रपट गृहात चित्रपट पाहून ही पुन्हा या चित्रपट पाहण्यासाठी आले होते महिला व लहानमुले यांनी चित्रपट पहिल्याने इतिहासाची माहिती त्यांना मिळाली यामुळे




ओंकार नलगे मित्र मंडळ व बजरंग दल, ग्रामपंचायत कोळगाव यांचे आभार ग्रामस्थानी मानले व छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचा जयघोष करण्यात आला.

## शालेय पोषण आहार कामगारांचा ७ मार्च रोजी आझाद मैदान येथे एल्गार मोर्चा

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शालेय पोषण आहार कामगार संघटना फेडरेशनचे राज्य अध्यक्ष कॉ प्रा ए बी पाटील यांच्या नेतृत्वाखाली शालेय पोषण आहार कामगारांचा दि.७ मार्च २०२५ रोजी आझाद मैदान येथे एल्गार मोर्चा काढण्यात येणार आहे.

दि.५ जुलै २०२४ रोजी १ हजार रुपयाची मानधनात वाढ झालेली आहे . त्या शासन निर्णय याची आमलंबजावणी करा इत्यादीसह अनेक प्रलंबीत मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे असे दिलेल्या प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात फेडरेशनचे राज्य सरचिटणीस डॉ .अशोक थोरात यांनी सांगितले आहे .या बाबत सविस्तर असे की , राज्यातील १ ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन देणाऱ्या शालेय पोषण आहार कामगारांमध्ये विधवा , परितकत्या , घटस्फोटीत , दलित ओबीसी व गरीब घरातील गरजू पुरुष महिला काम करतात . त्यांना अनेक प्रकारची सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत अनेक प्रकारची कामे करावे लागतात . त्यांचा या कामांमध्ये ६ तास वेळ जातो आणि या मोबदल्यात त्यांना देशात इतके कमी मानधन कुठेच नाही असे ८३ रुपये रोज या प्रमाणे २५०० रुपये महिना मानधन दिले जाते . आणि ते पण वेळेवर मिळत नाही .दि.५ जुलै २०२४ रोजी राज्य शासनाने कॅबीनेट मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये शालेय पोषण आहार कामगारांचाच्या मानधनामध्ये १ हजार रुपयाची वाढ करून शासन निर्णय जाहीर केलेला आहे . पण त्याची अंमलबजावणी केली नाही . त्यासाठी संघटनेच्या वतीने दि.५ सप्टेंबर २०२४ रोजी आझाद मैदान मुंबई येथे मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी शासनाने या कडे दुर्लक्ष करून आतापर्यंत त्या शासन निर्णयाची अंमलबजावणी केली नाही . या मुख्य मागणीसह अनेक प्रलंबित मागण्यासाठी यासाठी महाराष्ट्र शालेय पोषण आहार कामगार संघटना फेडरेशनच्या वतीने दि. ७ मार्च २०२५ रोजी दोन दिवशीय संप पुकारून आझाद मैदान येथे आयोजन केले आहे. या मोर्चाचे नेतृत्व सीटू संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा राज्य अध्यक्ष कॉ डॉ .डी एल कराड , कॉ एम एच शेख , कॉ के आर रघु , कॉ प्रा ए बी पाटील , कॉ डॉ अशोक थोरात , कॉ मिरा शिंदे हे करणार आहेत .

कॉ प्रभाकर नागरगोजे , कॉ अशोक पोपळे , अशोक कातखडे , मोहन ओव्हाळ , मधुकर गुंजाळ , अरुण कातखडे , कॉ लता खेपकर , शिवदास जगताप , विनायक पौळ , बालाजी तौर , सावित्रा मुळे , विनोद राऊत , मनिषा कुऱ्हे , ज्योती खोपडे , भाग्यश्री सांळुखे , मिरा दुन्गु , रमेश पंचाळ , हानुमंत रूपनर , उत्तरेश्वर हुलगे , कॉ भागवत जाधव, कॉ लक्ष्मण डोंगरे , आस्मा शेख , शिंधु नवगरे , सिमा घाडगे इत्यादी सह अनेक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त संख्यने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे .

## सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळण्यासाठी श्रीगोंदा तालुका बंद



> सरपंच हे गावचे प्रथम नागरिक असून ते जनतेच्या हितासाठीच कार्य करत असतात त्यांचा कुठल्याही एका व्यक्ती किंवा घटकाला दुखवण्याचा हेतू नसतो गावच्या विकास कामासाठी काही कठोर निर्णय घेणे गरजेचे असतात यासाठी सरपंच दोषी नसतो तसेच गावातील मुलासाठी सरपंच संतोष देशमुख धावून आले व त्याच्या रागातून त्यांची क्रूर हत्या झाली हे खूप निंदनीय आहे याला आळा घालण्यासाठी आरोपीना कठोरात कठोर शिक्षा दयावी ही सरपंच या नात्याने मागणी मागणी करतो
> – लोकनियुक्त सरपंच पुरषोत्तम लगड

**श्रीगोंदा । गणेश गाडेकर**

बीड सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्तेला काही महिने उलटूनही योग्य प्रकारे न्याय मिळत नसल्याचे दिसून येत असतानाच काळीज पिळवटून टाखणारे फोटो सोशल मीडियावर जनतेने पाहिल्यानंतर या प्रकरणा बदल जनतेत तीव्र संतापाची लाट उसळली असल्याने संतोष देशमुख यांना न्याय मिळून दोषींवर कठोरात कठोर शासन व्हावे यासाठी श्रीगोंदा तालुक्यात विविध ठिकाणी बंद पाळण्यात आला व जनतेने या बंद मध्ये सहभाग घेतला अशातच कोळगाव येथील नागरिकांनी यावेळी गाव बंद पाळत घटनेचा निषेध नोंदवला या वेळी सरपंच संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहण्यात आली यावेळी लोकनियुक्त सरपंच पुरषोत्तम लगड, नितिन आण्णा डुबल, नितिन नलगे, ओंकार नलगे, सुभाष लगड, शरद लगड, गिरीश नलगे,नाना बांदल,घोंडगे, साके, भापकर, मोरे, इ ग्रामस्थ उपस्थित होते.

## स्पर्धा परीक्षेची तयारी करत असताना अपयशाची भीती बाळगू नका-भाग्यश्री देशमुख

### पेशवा प्रतिष्ठान तर्फे सत्कार



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्पर्धा परीक्षेची तयारी करत असताना सातत्य ठेवणे गरजेचे असून अपयशाची भीती बाळगू नका असे मत भाग्यश्री श्रीपाद देशमुख यांनी मांडले.

नुकताच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महसूल सहाय्यक पदाचा निकाल जाहीर करण्यात आला. यात अंबाजोगाईची रहिवाशी कु. भाग्यश्री श्रीपाद देशमुख यांनी यश संपादित केल्याबद्दल पेशवा प्रतिष्ठान तर्फे सत्कार करण्यात आला.

प्राथमिक आरोग्य केंद्र घाटनांदूर येथे कार्यरत श्रीपाद देशमुख यांच्या मुलीच्या या यशाबद्दल पालकांचा ही सन्मान करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठान चे शिरीष हिरळकर, डॉ.महेश अकोलकर, श्रीकांत जोशी, गोविंद जोशी, अँड.वैजनाथ वांजरखेडे, पार्थ कुलकर्णी, अधिराज कुलकर्णी, रुपेश देशमुख, तुषार जोशी, श्रीपाद देशमुख, कल्याणी कुलकर्णी , स्मिता भातलवंडे, रेणुका भालेराव, प्रणिता पोखरीकर, श्रेया जोशी, ममता दीक्षित, तृप्ती जोशी, वैशाली देशमुख यांची उपस्थिती होती.

## गोमातीबाई लोहिया यांचे निधन

**अंबाजोगाई ।प्रतिनिधी**



अंबाजोगाई तालुक्यातील भारज गावचे रहिवाशी व हल्ली मु. अंबाजोगाई येथील श्रीमती गोमातीबाई पांडुरंगजी लोहिया यांचे मंगळवारी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्या ९४ वर्षाच्या होत्या. बुधवारी सकाळी ११ वाजता त्यांच्या पार्थिवावर येथील राजस्थानी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ५ मुले, ३ मुली, सूना, नातवंडे,असा परिवार आहे. येथील किराणा असोसिएशन व माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष दत्तप्रसाद लोहिया यांच्या त्या मातोश्री होत.

## जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित डान्स स्पर्धा-वर्षाताई जगदाळे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेना व म्हाळसा महिला प्रतिष्ठान यांच्या वतीनं २० मार्च २०२५ रोजी गुरुवारी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने एक विशेष डान्स स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. हॉटेल यशराज, जालना रोड, बीड येथील या स्पर्धेत १२ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुली आणि महिलांना भाग घेण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेच्या वेळापत्रकानुसार तारीख २० मार्च २०२५ वेळ सांयकाळी ५:०० ते ९:०० वाजता स्थळ हॉटेल यशराज, जालना रोड, बीड बक्षिसे



स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या नर्तकांना आकर्षक बक्षिसे जाहीर करण्यात आले आहेत प्रथम बक्षीस ११,००० द्वितीय बक्षीस ७,००० तृत्तीय बक्षीस ५,००० उत्तेजनार्थ पैठणी साडी नोंदणी प्रक्रिया स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी खालील फोन नंबरवर संपर्क साधून आपली नोंदणी करावी फोन नंबर ७३८५४०८९९९ / ९०१११३०१६७ / ९८२२५१३८७९ आपल्या कर्तृत्वाचा अस्वाद घेण्यासाठी आपले मनःपूर्वक स्वागत आहे. चला, आपल्या नारीशक्तीला उजाळा द्या आणि या स्पर्धेत भाग घ्या!

## प्रा.पंडीत कराड यांना मातृषोक

**अंबाजोगाई ।प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील योगेश्वरी महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य पंडीतराव



कराड यांच्या मातोश्री कै.वत्सलाबाई काशिनाथराव कराड रा. वांगदरी यांचे वृद्धापकाळाच्या आजाराने नुकतेच निधन झाले. मृत्यू समयी त्या ९५ वर्षाच्या होत्या. दि.५ मार्च बुधवार रोजी त्यांच्या मुळ गावी मोजे वांगदरी येथे अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी लातुर आणि बीड जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांचे पश्चात २ मुले, सुना, मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. निलंगा येथील नायब तहसीलदार रंगनाथ कराड यांच्या त्या मातोश्री होत.

# संपादकीय..

## मूलभूत बचत बँक खाते




नेहमीप्रमाणे आजही बरोबर ८च्या ठोक्याला दारावरची बेल वाजली. स्वयंपाक करणाऱ्या मावशी आल्याची वर्दी मिळाली. आज मावशींची स्वारी भलतीच खूश दिसत होती. हातातील पेढ्यांचा पुडा माझ्याकडे देत मुलीला दहावीच्या परीक्षेत ९३% मार्क मिळाल्याचे त्यांनी मला सांगितले. मावशींच्या कष्टांचे आणि त्यांच्या मुलीच्या मेहनतीचे चीज झाल्याचे समाधान वाटले. मावशी स्वयंपाक आटपून घरी जाताना मी त्यांच्या मुलीसाठी बक्षीस म्हणून पैसे पाकिटात घालून दिले. इतर कुठे खर्च न होता तिच्या शिक्षणासाठी त्याचा विनियोग व्हावा ह्या हेतूने, तिच्या नावे बँकेत खाते उघडून त्यात ते पैसे ठेवण्याचा सल्ला दिला. तेव्हा बँकेतील बचत खात्यात घातलेले सगळे पैसे काढता येत नाहीत. त्या खात्यात ठरावीक पैसे शिल्लक ठेवावेच लागतात, असे त्यांच्या मुलीचे म्हणणे त्यांनी मला सांगितले.

समाजातील अल्प उत्पन्न गटातील लोकांनाही किमान सामान्य अत्यावश्यक बँक सेवांचा लाभ घेता यावा यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने १७ ऑगस्ट २०१२ रोजी मूलभूत बचत बँक खात्याच्या घोषित केलेल्या योजनेबद्दल मी त्यांना माहिती दिली. याला शून्य शिल्लक बचत खाते असेही म्हणतात. मूलभूत बचत बँक ठेव खात्यात किमान शिल्लक आवश्यक नाही. खात्यात शिल्लक असले तर त्या रकमेवर ठरावीक दराने व्याज मात्र मिळते. परिणामी, शून्य शिल्लक बाबतीत कोणताही दंड आकारला जात नाही हेच या प्रकारचे खाते उघडताना ग्राहकांसाठी मुख्य आकर्षण ठरू शकते. या प्रकारचे खाते उघडण्यासाठी कोणत्याही प्रारंभिक ठेवीची आवश्यकता नसते. यासाठी वयाची वा किमान उत्पन्नाची अट नाही. कोणतीही निवासी व्यक्ती व हिंदू अविभक्त कुटुंबे मूलभूत बचत बँक खाते उघडण्यास पात्र असतात.

प्रत्येक प्रकारच्या बँक खात्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेचे विशिष्ट नियम व अटी लागू असतात. बचत खाते, चालू खाते, आवर्ती ठेव खाते, मुदत ठेव खाते, डिमॅट खाते किंवा एनआरआय खाते अशा विविध प्रकारची कितीही बँक खाती ग्राहक आपल्या गरजेनुसार कुठल्याही आणि कितीही बँकांमध्ये उघडू शकतात. मात्र भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार, ग्राहक मूलभूत बचत खाते मात्र एकापेक्षा जास्त उघडू शकत नाही. केवळ एकच मूलभूत बचत खाते ग्राहक, कोणत्याही एकाच बँकेत उघडू शकतो. मूलभूत बचत खात्यासाठी अर्ज करताना, तुमचे इतर कोणत्याही बँकेत मूलभूत बचत खाते नाही असे एक घोषणा पत्र तुम्हाला बँकेला द्यावे लागते. त्या बँकेत ग्राहकाचे इतर कुठल्याही प्रकारचे खाते नसणे अनिवार्य आहे. दुसरे कुठल्याही प्रकारचे खाते असल्यास, मूलभूत बचत खाते उघडलेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, ते बंद करणे अनिवार्य आहे. असे केले नाही तर ती इतर खाती बंद करण्याचा अधिकार बँकेला असतो. ग्राहकांनी लेखी संमती दिल्यास ग्राहकांच्या विनंतीवरून सामान्य बचत बँक खात्याचे मूलभूत बचत खात्यामध्ये रूपांतरण केले जाऊ शकते. अशावेळी मूलभूत बचत खात्यामध्ये उपलब्ध असलेल्या सेवांची वैशिष्ट्ये आणि व्याप्ती बँकेने ग्राहकांना सूचित करणे आवश्यक असते. मूलभूत बचत खात्यांमध्ये तुम्ही दरमहा होणाऱ्या व्यवहारांवर मर्यादा असते. सहसा, बँका प्रत्येक महिन्यात फक्त चार वेळा पैसे काढण्याची परवानगी देतात. तुम्ही परवानगी दिलेल्या संख्येपेक्षा जास्त वेळा पैसे काढल्यास, बँक तुमचे शून्य शिल्लक खाते नियमित बचत खात्यात रूपांतरित करू शकते. ग्राहकांना पूर्वसूचना देऊन या अतिरिक्त व्यवहारांसाठी काही बँका नाममात्र शुल्क देखील आकारू शकतात. तसेच या खात्यात एका वर्षात एक लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम जमा करता येत नाही किंवा खात्यात कधीही पन्नास हजार रुपयापेक्षा जास्त रक्कम शिल्लक ठेवता येत नाही. सदर खात्यातून एका महिन्यात रुपये १०००० पेक्षा जास्त रोख रक्कम काढता आणि इतर खात्यांत हस्तांतरण करता येत नाही.

मूलभूत बचत खात्यांमध्ये ठेवी आणि रोख रक्कम काढणे, विविध नेटबँकिंग सुविधांद्वारे पैसे पाठवणे आणि प्राप्त करणे किंवा बँक शाखांमध्ये चेक जमा करणे तसेच एटीएमच्या माध्यमातून पैसे मिळवणे ह्या मोफत सेवा समाविष्ट आहेत. मूलभूत बचत खाते उघडताना एटीएम डेबिट कार्डवर कोणतेही वार्षिक शुल्क आकारले जात नाही. एटीएम डेबिट कार्ड घेणे ऐच्छिक असते. एखाद्या ग्राहकाने एटीएम डेबिट कार्ड स्वीकारलेच पाहिजे अशी सक्ती बँक करू शकत नाही. मात्र, जर ग्राहकांनी एटीएम डेबिट कार्ड निवडले, तर बँकांनी अशा ग्राहकांना एटीएम डेबिट कार्ड, एटीएम पिन आणि त्याच्याशी संबंधित जोखीम याबद्दल शिक्षित करणे आवश्यक आहे. आपल्या इतर ग्राहकांना एटीएम डेबिट कार्ड आणि पिनच्या वितरणासाठी अवलंब करत असलेल्या प्रक्रियेचाच अवलंब करून सुरक्षित वितरण वाहिन्यांद्वारे मूलभूत बचत खातेधारकांना ही सुविधा प्रदान करणे अनिवार्य आहे. ग्राहक या खात्याचे बँक स्टेटमेंट तपासू शकतो. संगणक किंवा फोनवरून वीज, फोन आणि पाणी बिलही भरू शकतो. मूलभूत बचत खात्यासंबंधी सविस्तर माहिती देऊन जवळच्या बँकेत मुलीच्या व मावशींच्या नावे मूलभूत बचत खाते उघडण्याविषयी मावशींना मी सुचवले. त्यामुळे मुलीच्या पुढील शिक्षणासाठी लागणाऱ्या पैशांची तरतूद करता येईल. मूलभूत बचत खात्याची उपयुक्तता व महत्त्व आमच्या मावशीपर्यंत पोहोचले. आपल्या आजूबाजूच्या आपल्याला मदत करणाऱ्या बऱ्याच व्यक्ती अनेक महत्त्वाच्या उपयुक्त माहितीविषयी अनभिज्ञ असतात. त्यांना सुजाण, सजग, सक्षम ग्राहक बनवण्याचा प्रयत्न करू या. किंबहुना आपण नवीन वर्षाचा हा आपला संकल्प बनवू शकतो.

# हिमालयात बर्फ न टिकण्याचे नवे संकट



ओम पर्वत, बद्रीनाथ आणि केदारनाथ यांसह मध्य हिमालयाच्या उंच टेकड्यांवर नोव्हेंबरपासून बर्फवृष्टी सुरू होते. यंदा डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात बर्फवृष्टी सुरू झाली आहे; पण उंच टेकड्यांवर हा बर्फ जास्त काळ राहण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे वैज्ञानिक चिंतित असून हिमालयीन प्रदेशासह मोठ्या नद्यांच्या पाणलोट आणि लाभक्षेत्रात जलसंकट निर्माण होण्याची शक्यता आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, ईशान्येचा भाग वगळता उर्वरित हिमालयीन प्रदेशात या वर्षी सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे आणि पाऊस कमी झाला तर बर्फ कमी पडेल. त्याचा हिमालयाशी संबंधित पाच देशांवर व्यापक प्रभाव पडतो. कारण हिमालय हा आशियाचा जल स्तंभ असण्याबरोबरच या खंडाचा हवामान नियंत्रकदेखील आहे. भारतीय हवामान विभागाच्या मते उत्तर आणि उत्तर-पश्चिम भारताच्या बहुतेक भागात पूर्व आणि ईशान्य भारताच्या काही भागांत सामान्यपेक्षा कमी पाऊस पडू शकतो. येत्या काळात दक्षिण भारतातील द्वीपकल्पीय भागात सामान्यपेक्षा १२१ टक्के जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. अंदाजानुसार, दक्षिण पॅसिफिक महासागरात तटस्थ 'अल निनो' परिस्थिती आहे, तर 'ला निना' परिस्थिती आणखी विकसित होऊ शकते. त्यामुळे भारतीय हवामानावर परिणाम होऊ शकतो. कमी पावसामुळे, हिमालयातील उंच शिखरे आणि खोऱ्यांना बर्फाऐवजी हलका पाऊस किंवा कोरड्या हवामानाचा सामना करावा लागू शकतो. तज्ज्ञांच्या मते, हिमालयात कमी पाऊस आणि कमी बर्फवृष्टीची मुख्य कारणे म्हणजे जागतिक हवामानबदल, 'अल निनो'चा प्रभाव, वातावरणातील दाब आणि मानवी क्रियाकलापांतील बदल. वातावरणातील दाबाच्या नमुन्यातील बदलांमुळे उत्तर-पश्चिमी वारे हिमालयाच्या वरच्या भागात पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे पाऊस आणि बर्फवृष्टी कमी होऊ शकते. जागतिक हवामानबदलामुळे तापमान वाढत आहे. त्याचा परिणाम बर्फवृष्टीच्या प्रक्रियेवर होतो. उष्णता वाढली की बर्फाऐवजी पाऊस अधिक पडू लागतो. याव्यतिरिक्त, पृथ्वीच्या हवामान चक्रात नैसर्गिक बदल आहेत, जसे की आंतरमॉन्सून आणि मॉन्सून ब्रेक्स. त्यामुळे हिमालयाच्या प्रदेशात कमी पाऊस आणि बर्फवृष्टी होऊ शकते. कमी हिमवर्षाव म्हणजे बर्फ वितळणे. त्याचा थेट परिणाम नद्यांच्या जलपातळीवर होतो. यामुळे पाण्याचे संकट उद्भवू शकते. त्याचा परिणाम शेती, पिण्याचे पाणी आणि उद्योगांवर होतो. गंगा, यमुना, सतलज, सिंधू आणि ब्रह्मपुत्रा या ग्लेशियरवर आधारित नद्या भारतीय उपखंडासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कारण या नद्या केवळ पाणीपुरवठ्याचे प्रमुख स्त्रोत नसून शेती, उद्योग, वीजनिर्मिती आणि पिण्याच्या पाण्यामध्येही मोठी भूमिका बजावतात. वाढत्या उष्णतेमुळे मॉन्सूनची दिशा आणि स्वरूप बदलू शकते. त्यामुळे असामान्य पाऊस आणि दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. हिमालयातील बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे पाणीपुरवठ्यात घट होऊ शकते. रब्बी आणि खरीप पिकांवर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. हिमालयीन प्रदेशात स्कीइंग, ट्रेकिंग आणि बर्फावर आधारित इतर पर्यटन उपक्रम खूप प्रसिद्ध आहेत. बर्फवृष्टी कमी झाल्यामुळे या क्रियाकलापांचे आकर्षण कमी होऊ शकते. त्याचा पर्यटन उद्योगावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. याचा परिणाम स्थानिक रोजगार आणि आर्थिक क्रियाकलापांवर होऊ शकतो. या स्थितीत हिमालयातील हवेचा दाब आणि वायुगतीकीमध्ये बदल होऊ शकतो. यामुळे वायू प्रदूषणाची पातळी वाढून श्वसनाचे आजार आणि आरोग्य समस्या उद्भवू शकतात. हिमालयात कमी बर्फवृष्टीमुळे उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होऊ शकतात. अतिउष्णतेमुळे उष्माघात, निर्जलीकरण आणि इतर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. अशा परिस्थितीत सरकार आणि सामान्य जनतेने कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी अगोदरच तयार राहणे आवश्यक आहे. खास रचनेसाठी ओळखल्या जाणाऱ्या ओम पर्वतावरील बर्फापासून बनवलेला ओमचा आकार काढून टाकण्यात आला. ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात हा बर्फ गायब झाला. शास्त्रज्ञांच्या मते ओम पर्वत भारत, चीन आणि नेपाळच्या सीमेवर स्थित आहे आणि समुद्रसपाटीपासून सुमारे ५९०० मीटर उंचीवर आहे. हा पर्वत कैलास मानसरोवर यात्रेतही महत्त्वाचा थांबा आहे. चीनच्या सीमेला लागून असलेल्या लिपुलेखपर्यंतचा रस्ता तयार झाल्यानंतर येथील पर्यटकांची संख्याही वाढली. अल्मोडा येथील 'सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंटल असेसमेंट अँड क्लायमेट चेंज सेंटर'चे जे. सी. कुनियाल यांच्या म्हणण्यानुसार, जगभरात हंगामी बदल दिसून येत आहे. ओम पर्वतावरही हवामान बदलाचा परिणाम दिसून येत आहे. जागतिक तापमान वाढत आहे आणि त्याचा सर्वाधिक परिणाम हिमनद्यांवर होत आहे.

जंगलाला आग लागण्याच्या घटना आणि त्याची व्याप्ती वाढत आहे, हे विशेष. जंगलातील आगीतून निघणारा काळा कार्बन हिमनद्यांवर परिणाम करतो. हिमनदीच्या चांगल्या आरोग्यासाठी त्याच्या खाली असलेल्या झुडपांमध्ये चांगले गवत असावे. अल्पाइन प्रदेशातील जंगलांचे आरोग्य चांगले असावे. या सगळ्यामुळे तापमान संतुलित राहते. या सगळ्याकडे एकत्रितपणे पाहण्याची गरज आहे. संयुक्त राष्ट्रांनी आधीच इशारा दिला आहे. २०२२ च्या संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार, हिमालयातील एक तृतीयांश हिमनद्याला 'ग्लोबल वार्मिंग'चा धोका आहे. वाढत्या तापमानामुळे २००० पासून हिमनदी वितळण्याचे प्रमाण वाढले आहे. ग्लेशियर्स दरवर्षी ५८ अब्ज टन बर्फ गमावत आहेत. हे फ्रान्स आणि स्पेनच्या एकूण पाण्याच्या वापराच्या बरोबरीचे आहे. 'द इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माउंटन डेव्हलपमेंट'च्या मते हिंदुकुश हिमालयीन प्रदेशात तापमान वाढीचा दर जागतिक दरापेक्षा खूप जास्त आहे. २०२३-२४ च्या हिवाळ्यात संपूर्ण प्रदेशात विक्रमी कमी हिमवृष्टी झाली. विशेषत: पश्चिम हिमालयात फार कमी हिमवर्षाव झाला. २०२३ च्या भारतीय हवामान विभागाच्या अहवालानुसार, गेल्या वर्षी मॉन्सूननंतर उत्तराखंडमध्ये ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये तापमानात दोन अंशांपेक्षा जास्त बदल झाला होता. याशिवाय हिवाळ्यानंतर पावसाचे प्रमाण खूपच कमी होते. या वर्षी उत्तराखंडच्या मैदानी आणि डोंगराळ भागात भीषण उष्मा होता. डेहराडूनमध्ये तापमान ४४ अंशांवर पोहोचले आहे. ग्लेशियोलॉजिस्ट डॉ. अनिल देशमुख यांच्या मते, देशाच्या इतर भागांच्या तुलनेत हिमालयात तापमान अधिक वेगाने वाढत आहे. याला एलिव्हेटेड इफेक्ट म्हणतात. जसजशी उंची वाढते तसतसे तापमानही वाढते. त्यामुळे, हंगामी बर्फ आता उन्हाळ्यात तसेच हिवाळ्यात आणि वसंत ऋतूमध्ये वेगाने वितळत आहे.ओम पर्वतावरील बर्फ गायब होणे हा त्याचा पुरावा आहे. गेल्या ३० ते ४० वर्षांच्या मूल्यांकनावरून असे दिसून येते, की बर्फवृष्टीचे प्रमाण कमी होत आहे आणि पावसाचे प्रमाण वाढत आहे. कमी बर्फ आणि वाढत्या तापमानामुळे हिमनद्या वितळत आहेत. गढवाल विद्यापीठाचे प्राध्यापक आणि हिमनदी शास्त्रज्ञ एचसी नैनवाल यांनी सांगितले, की हवामानातील बदल आणि 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे हिमवर्षाव कमी होत आहे. हिमनद्यांमध्ये बर्फ साचू शकत नाही, हे भविष्यातील जलसंकटाचे लक्षण आहे. हिमालयीन प्रदेश हिमवर्षाव नसलेले दिसतात. नैनवाल म्हणतात की, हिमवर्षाव नसणे ही चिंतेची बाब आहे; परंतु त्याहून धक्कादायक बाब म्हणजे हिमनदीतील रात्रीचे तापमान वाढत आहे. त्यामुळे बर्फवृष्टी झाली तरी बर्फ वेगाने वितळत आहे. ग्लेशियरमध्ये बर्फ गोठत नसेल तर हिमनदीचे वस्तुमान संतुलन ऋणात्मक होते. रात्रीच्या वेळी हिमनदीचे तापमान हवे तितके थंड नसते. नोव्हेंबर ते मार्च या कालावधीत हिमनदीमध्ये सर्वाधिक बर्फ पडतो. मे ते ऑक्टोबर या काळात बर्फ वितळतो. जेव्हा पृथ्वी तापमानवाढीच्या अवस्थेत असते, तेव्हा हिमनद्या मागे सरकतात. म्हणजे त्यांची घनता आणि जाडी कमी होते.

# विद्यार्थ्यांनी करा अभ्यासाचा संकल्प!



सन २०२५ या नवीन वर्षाचा आज चौथा दिवस आहे. नवीन वर्ष सुरू झाले की प्रत्येकजण जीवनात यशवंत होण्यासाठी नवीन संकल्प करीत असतात. विद्यार्थ्यांच्या जीवनात परीक्षा महत्त्वाची असते. त्या आनुषंगाने अभ्यास सुद्धा महत्त्वाचा असतो. तेव्हा विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत असताना आपल्या परीक्षा डोळ्यांसमोर ठेवून अभ्यासाचा संकल्प केला पाहिजे. यातच त्यांचे परीक्षेतील यश अवलंबून असते. नवीन वर्ष सुरू झाले की प्रत्येकजण आपला संकल्प करीत असतात. त्यासाठी तो मागील वर्षाच्या चुका सुधारून पुन्हा तशा चुका होणार नाहीत याची काळजी घेत नवीन संकल्प सुरू करीत असतात. जीवनात यशस्वी होण्यासाठी नवा संकल्प करावा लागतो. त्यासाठी आपले उद्दिष्ट ठरवून डोळ्यांसमोर ठेवावे लागते. प्रत्येकाचे उद्दिष्ट वेगवेगळे असले तरी विद्यार्थ्यांचे मुख्य उद्दिष्ट आपण चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावे हे असते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास केला पाहिजे. एक दिवस किंवा परीक्षेच्या आदल्या रात्री रात्रभर अभ्यास केला म्हणजे आपल्याला चांगले गुण मिळतील असे नाही. शेवटी आत्मविश्वासाने व प्रसन्न वातावरणामध्ये तीन तास पेपर अचूक सोडवावा लागणार आहे. याची तयारी झाली का? याचे उत्तर विद्यार्थ्यांनी आता शोधत बसण्यापेक्षा जे विद्यार्थी बोर्डाची परीक्षा देणार आहेत त्यांनी नवीन वर्षाचे स्वागत करीत वेळ वाया न घालविता अभ्यासाचा संकल्प करावा. यातच त्यांचे भवितव्य आहे.

मागील वर्षाला गुड बाय म्हणत असताना अभ्यासक्रम सुद्धा शिकवून पूर्ण झाला असेल. तेव्हा नवीन वर्षाला वेलकम म्हणत वेळ घालविण्यापेक्षा आतापर्यंतची अभ्यासातली प्रगती लक्षात घेऊन वार्षिक परीक्षेत जास्तीत जास्त गुण कसे मिळतील त्याचा संकल्प करावा. आता हीच वेळ आहे, हे विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवावे.त्यासाठी आतापासून परीक्षा होईपर्यंत आपले आरोग्य सांभाळून वेळेचे नियोजन करून अभ्यास करावा. म्हणजे वेळेचे नियोजन जरी केले तरी दिवसातील किती तास अभ्यास करणार आहोत त्याचा संकल्प विद्यार्थ्यांना करावा लागेल. यातच त्यांचे यश अवलंबून आहे. त्यासाठी आपली परीक्षेसाठी तयारी किती झाली याचे उत्तर त्यांनी स्वत:ला प्रामाणिकपणे द्यावे. हीच यशाची पायरी आहे. नवीन वर्षाची सुरुवात करीत असताना विद्यार्थ्यांनी इतर संकल्प बाजूला सारून आपल्या भवितव्यासाठी आपले विषय व त्या विषयाच्या अभ्यासक्रमाचा विचार करून अभ्यासाचा संकल्प करावा. त्यासाठी परीक्षा होईपर्यंत मित्र, नातेवाईक व सखा मित्र बनलेला मोबाईल यांना दूर ठेवून अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. त्याचप्रमाणे लिखाणाची सुद्धा नियमित सवय ठेवावी. परीक्षा संपल्यावर पाहुणचार करावा मात्र आता परीक्षा होईपर्यंत पाहुणचाराचा विचार करू नये. काही विद्यार्थी शैक्षणिक वर्ष सुरू झाले की आपण चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावे हा संकल्प डोळ्यांसमोर ठेवून नियमित अभ्यास करीत असतात. त्यामुळे ते परीक्षेला हसत हसत सामोरे जावून विशेष श्रेणीत पास होतात. आलीकडे तर १०० टक्के गुण मिळवून विद्यार्थी उत्तीर्ण होऊ लागले आहेत. तसेच शाळांचा सुद्धा १०० टक्के निकाल लागतो. यासाठी शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासून संकल्प केला जातो. तसेच हे यश संकल्पामुळेच शक्य होते. तेव्हा जीवनात यश संपादन करायचे असेल तर मनापासून संकल्प हा अतिशय महत्त्वाचा असतो. जीवनात संकल्पाशिवाय यश संपादन करू शकत नाही. त्यासाठी जिद्द अतिशय महत्त्वाची असते. आता विद्यार्थ्यांनी मागील वर्षातील चुका उजळत बसण्यापेक्षा त्या बाजूला सारून अंतिम परीक्षेची तयारी कशी करता येईल त्या दृष्टिकोनातून संकल्प करावा. तेव्हा विद्यार्थ्यांनी मागील परीक्षेतील आपली प्रगती लक्षात घेऊन अभ्यासाला लागावे. ते सुद्धा परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्यासाठी अभ्यास करावा. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाचे सोने करण्यासाठी अभ्यासाचा संकल्प करावा. त्यासाठी वेळेकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. प्रत्येक दिवसाचे नियोजन करून त्याप्रकारे विषयांचे वेळापत्रक तयार करावे लागेल. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करू नये. दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. तेव्हा प्रत्येक विषयाची परीक्षा कधी आणि मध्ये सुट्टी किती दिवस आहे याचा अंदाज घेऊन अभ्यासाला लागावे.महत्त्वाची बाब म्हणजे आता वेळ कमी आहे. अभ्यास अभ्यासक्रमानुसार करावा. त्यानंतर आपली किती तयारी झाली याचा सुद्धा विद्यार्थ्यांनीच विचार केला पाहिजे. आता अवांतर वाचनाकडे जास्त लक्ष देऊ नये याची खबरदारी विद्यार्थ्यांनी घ्यावी. तसेच घरातील टीव्हीपासून चार हात दूर राहावे. पालकांनी सुद्धा मुलांचे भवितव्य ओळखून आपल्या मुलांच्या अभ्यासामध्ये व्यत्यय येणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. मुलांच्या परीक्षा होईपर्यंत विशेष कार्यक्रमांपासून दूर राहावे. महत्त्वाची बाब म्हणजे मुलांच्या जेवणामध्ये बदल करू नये. परीक्षा कालावधीत त्याला जे आवडते तेच जेवण द्यावे. शक्यतो बाहेरील पदार्थ खाणे टाळावे. तेव्हा नवीन वर्षाचा आज ४ था दिवस आहे. आता विद्यार्थ्यांनी वार्षिक परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळवून जीवनात चांगले यश संपादन करण्यासाठी आजपासून परीक्षा संपेपर्यंत आपल्या मनातील ताण तणावावर मात करत अभ्यासाचा संकल्प करायला हवा. हीच खरी यशाची गुरुकिल्ली आहे.

# बाबुराव रुपनर,कॉ.एड.अजय बुरांडे यांचा सत्कार अनेक गाव एकत्र येत कार्यक्रमाचे आयोजन

**परळी । प्रतिनिधी**

नायब तहसीलदार पदावरुन सेवानिवृत्त कार्यतत्पर बाबुराव रुपनर व माकप च्या राज्य समितीवर कॉ.एड. अजय बुरांडे यांची निवड झाल्या बद्दल तालुक्यातील २० पेक्षा अधिक गावकऱ्यांनी एकत्र येत पिंपळगाव (गाढे) येथे सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी जनहित ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या नुतन पदाधिकाऱ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

आठरा पगड जाती-जमाती एकत्र येत सुखाने नांदत असलेल्या परळी तालुक्यातील पिंपळगाव (गाढे) येथे गावातील सामाजिक बांधिलकी ठेवून गावातील लोकांचा सुसंवाद व्हावा हा विषय ठेवून गावातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रभाकरराव वाघमोडे यांच्या संकल्पनेतून गावकऱ्यांनी बुधवार (दि ५) सकाळी परिसरातील अनेक गावच्या प्रमुख व्यक्तींनी आणि गावकऱ्यांनी एकत्र येत सेवानिवृत्त नायब तहसीलदार



बाबुराव रुपनर व कॉ.एड.अजय बुरांडे यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसंतराव देशमुख होते. यावेळी जेष्ठ नेते प्रभाकर वाघमोडे, उत्तम माने, प्रभाकर पौळ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जनहित ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अनिल माने तर उपाध्यक्षपदी सुभाष पौळ यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिसरातील कौडगाव (सा), आचार्य टाकळी यासह २० गावच्या सरपंच आणि गावकऱ्यांसह कार्यक्रमात सर्व माजी सरपंच वसंतराव सोनवणे, चंद्रकांत सोनवणे, प्रताप कराड, शरद राडकर, सरपंच अमोल घुमरे उपसरपंच पांडुरंग गंगणे, जयवंत कराड, श्रीनीवास बाळे, श्रीरामजी अरसुळे, बाबु सुतार, राजेश्वर देशमुख, एकनाथ कुंभार आदी सह अनेकांनी मेहनत घेतली.

# बाबुरावजी आडसकर महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सवानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा

**केज । प्रतिनिधी**

केज येथील बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज येथे संविधान गौरव महोत्सव २०२५ अंतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी उपक्रम राबविण्यात आला. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा खुली होती .स्पर्धेतील सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरूपाचे होते. विद्यार्थ्यांना संविधान, त्याचा इतिहास, मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि भारताच्या लोकशाही व्यवस्थेशी संबंधित प्रश्न विचारण्यात आले. स्पर्धेच्या माध्यमातून संविधानाविषयी मूलभूत माहिती विद्यार्थ्यांना मिळालीस्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि आपल्या ज्ञानाची परीक्षा पाहण्याची संधी साधली. प्रश्नमंजुषेतील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या




विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे बक्षिसे प्रदान करण्यात येणार आहे. तसेच, सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.संविधान हा आपल्या देशाचा आधारस्तंभ आहे. त्याचे योग्य आकलन आणि पालन करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. अशा प्रकारच्या प्रश्नमंजुषा स्पर्धांमुळे संविधानाविषयीची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत सहज आणि रोचक पद्धतीने पोहोच करण्यात आलीया आयोजन करून संविधान जागरूकता वाढवण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. फावडे एम. जी. यांनी मार्गदर्शन केले. या प्रश्नमंजुषेचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना (छडड) विभाग, वाणिज्य विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा. डॉ. श्याम सरसरे, प्रा. यादव जी. बी., वाणिज्य विभागाचे प्रा. डॉ. आगळे एस. व्ही., प्रा. डॉ. काळम पी. जी., राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. गालफाडे ए. बी., प्रा. डॉ. शिंदे एस. के. आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# भारताची चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत धडक, कांगारूंवर नोंदवला मोठा विजय

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत भारताने ऑस्ट्रेलियाला ५ गडी राखून पराभूत केलं. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने २६५ धावांचं आव्हान दिलं होतं. हे आव्हान भारताने ४ गडी राखून पूर्ण केलं. यासह चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. या सामन्यात विराट कोहलीची खेळी निर्णायक ठरली. खरं तर या मैदानावर २६५ धावांचं लक्ष्य गाठणं कठीण होतं. पण टीम इंडियाने विजय मिळवून दाखवला. या विजयासह टीम इंडियाने वनडे वर्ल्डकप पराभवाच्या जखमेवर मलम चोळलं आहे. भारताने सलग तिसऱ्यांदा अंतिम फेरी गाठली आहे. २०१३ मध्ये जेतेपद, २०१७ पाकिस्तानकडून पराभव आणि आता पुन्हा एकदा अंतिम फेरी गाठली आहे. भारताचा अंतिम फेरीत सामना न्यूझीलंड-दक्षिण अफ्रिका यांच्यातील विजयी संघाशी होणार आहे




# औरंग्याचे उदात्तीकरण करणाऱ्या अबू आझमीवर देशद्रोहाखाली तात्काळ अटकेची कारवाई करावी

## भाजपा आ.प्रविण दरेकरांची सभागृहात मागणी



**मुंबई । प्रतिनिधी**

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेब हा क्रूर प्रशासक नव्हता असे विधान केले. त्यांच्या या विधानाचे पडसाद विधानपरिषदेतही उमटले. भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी संताप व्यक्त करत औरंग्याचे उदात्तीकरण करणाऱ्या अबू आझमीवर राजद्रोह, देशद्रोह व राज्य अस्थिर करण्याच्या गुन्ह्याखाली तत्काळ अटक करावी, अशी मागणी सभागृहात केली आहे.

आज अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानपरिषदेचे कामकाज सुरु झाल्याबरोबर आ.दरेकर यांनी विधानसभा सदस्य अबू आझमी यांच्या वक्तव्याचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले कि, छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांचे बलिदान हा देश कधीही विसरू शकणार नाही. औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांना हालहाल करून मारले. ज्यांनी काल औरंग्याची आरती ओवाळली त्यांच्याच पिलावळीने मागील वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या स्मृतीदिनी सोशल मीडियावर औरंगजेब, टिपू सुलतानला हिरो ठरविणारे आणि महाराजांचा अपमान करणारे स्टेटस ठेवले होते. त्यानंतर संभाजीनगर, अकोला, शेवगाव, संगमनेर, कोल्हापूर आणि राज्यातील इतर भागात हिंसाचाराच्या घटना घडल्या. त्यावेळी विरोधी पक्षाने कायदा सुव्यवस्थेसंदर्भात ओरड केली होती. राज्यातील कायदा सुव्यवस्था कोण बिघडवतेय ? औरंग्याची बढाई करणारा हा धर्मांध चुकीचा इतिहास दाखविल्याचा दावा करतो. अबू आझमी औरंग्याला क्रूर मानत नाही. संभाजी महाराजांच्या बाबतीत औरंगजेबाने जे केले तो क्रूरतेचा कळस होता. म्हणजे यापेक्षाही क्रूरता दाखवायला हवी होती, अशी तर अबू आझमींची भावना नव्हती ना, असा संशयही दरेकर यांनी व्यक्त केला. ज्या औरंग्याने आमच्या संभाजी महाराजांचा कटकारस्थानाने जीव घेतला त्यांचे उदात्तीकरण करणारे हेही औरंग्याच्याच विचाराचे आहेत. अबू आझमींनी केवळ औरंगजेबाचे उदात्तीकरण केले नाही तर महाराष्ट्रातील विशिष्ट धर्माच्या लोकांना चिथावणीही दिलीय. त्यांनी देशद्रोह, राजद्रोह केलाय, तरुणांची डोकी भडकावून राज्य अस्थिर करण्याचा प्रयत्न केलाय. त्यामुळे औरंग्याचे उदात्तीकरण करणाऱ्या अशा सदस्याला आजच्या आज देशद्रोहाखाली अटक करावी, अशी मागणीही दरेकर यांनी केली.


# पोलीस कुटुंब आरोग्य योजनेतील रुग्णालयांची माहिती पोलिसांना द्यावी-रेल्वे पोलीस दलाचे आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना' अंतर्गत रेल्वे पोलिसांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या रुग्णालयांची माहिती देण्यात यावी असे आदेश रेल्वे पोलीस आयुक्तालयातून काढण्यात आले आहेत. या योजनेनुसार पोलीस आणि त्यांच्या कुटुंबासाठी मुंबईसह राज्यभरात रुग्णालये उपलब्ध करून देण्यात आली असून, त्यात मुंबईतील पोलिसांसाठी २९ आणि राज्यातील सर्व जिल्ह्यातील पोलिसांसाठी २२५ रुग्णालये उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

योजनेनुसार मुंबईसह राज्यातील शहर आणि रेल्वे पोलीस अधिकारी तसेच कर्मचारी यांच्या कुटुंबियाना काही गंभीर आजारावर उपचार सुविधा यातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र अनेकांना याबाबत माहिती नसते. त्यामुळे सबंधित खाते प्रमुखांनी ती सर्वांना उपलब्ध करून द्यावी सर्व घटक प्रमुखांना सूचित केले आहे. यातील लाभ हे पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांच्या कुटुंबियांना दिले जातात. या कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत येत असलेल्या रुग्णालयांची माहिती देताना या योजनेअंतर्गत येत असलेल्या रुग्णालयांची यादीही रेल्वे पोलीस आयुक्तालयाने उपलब्ध करून दिली आहे. तर दुसरीकडे त्यामध्ये उपलब्ध असलेल्या उपचारांची संपूर्ण माहिती पोलीस कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर, वैद्यकीय दवाखाना, क्लब हाऊस, ग्रोसरी शॉप, शासकीय वसाहती, मनोरंजन कक्ष येथे ठळक अक्षरात दर्शनी भागावर लावण्यात यावी असे आदेशात म्हटले आहे. विशेष म्हणजे यासाठी पोलीस वसाहतीत बैठका आयोजित करुन पोलीस आणि त्यांच्या कुटुंबियांना रुग्णालय आणि आजार याबाबतची संपूर्ण माहिती आता दिली जाणार आहे.

याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाकडून खास पत्रक काढण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. त्यानुसार लोहमार्ग पोलीस आयुक्तालया अंतर्गत कार्यरत असलेल्या सर्व कार्यालये, पोलीस ठाणे, शाखा येथील पोलिसांना ही माहिती देण्याचे काम सुरू होणार आहे. दरम्यान, यापुढे रेल्वे पोलिसांच्या



कार्यालयात पोलीस ठाणेत योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे. तर घाटकोपर मुख्यालय येथील राखीव पोलीस निरीक्षक यांनीही पोलीस वसाहतीत बैठका आयोजित करुन पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांना व त्यांच्या कुटुंबियांना ही माहिती दयावी व पोलीस हॉस्पिटलमध्ये एक प्रत दर्शनी भागावर लावावी असेही सूचित केले आहे. या आजारांवर दिले जाणार उपचार - महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना अंतर्गत ज्या आजारांवर मोफत आणि दिलेल्या रकमेच्या मर्यादेत उपचार केले जातील त्या आजाराची यादी वरिष्ठ रेल्वे पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. ही योजना २००५ पासून सुरू केली आहे. मात्र आता नवीन आजार आणि उपचार यांची माहिती देत गंभीर आजारांची यादी स्पष्ट केली आहे. त्यात हृदयविकाराचा झटका, फुप्फुसांच्या विकाराचा झटका, ॲन्जिओग्राफी चाचणी, अति रक्तदाब, धनुर्वात,

घटसर्प, अपघात, आघात संलक्षण, हृदयाशी आणि रक्तवाहिनीशी संबंधित आजार, गर्भपात, तीव्र उदर वेदना - आंत्र अवरोध, अती रक्तस्त्राव, गॅस्ट्रो-एन्ट्रायटिस, विषमज्वर, निश्चेतनावस्था मनोविकृतीची सुरुवात, डोळयातील दृष्टीपटल सरकणे, स्त्रीरोगशास्त्र आणि प्रसुतीशास्व यांच्याशी संबंधित आकस्मिक आजार, जननमुत्र आकस्मिक आजार, वायू कोच, कान, नाक किंवा घसा यामध्ये विजातीय पदार्थ गेल्यामुळे निर्माण झालेले आकस्मिक आजार, ब्रेन ट्युमर, भाजणे, ॲक्यूट ग्लॅकोमा, स्पायनस स्कॉड (मज्जारज्जू) संबंधात आकस्मिक आजार, उष्माघात, रक्तासंबंधातील आजार यांचा समावेश आहे.


# ‘१०० डे’ उपक्रमांतर्गत सर्व पोलीस ठाण्याचा चेहरामोहरा बदलणार

**मुंबई । प्रतिनिधी**

सरकारच्या ' १०० डे उपक्रमांतर्गत सर्व सरकारी कार्यालयासह पोलीस ठाण्याच्या इमारतीचे नुतनीकरण, साफसफाई, रंगरंगोटी आतील आणि बाहेरील बाजूस स्वच्छता,

नवीन सुधारणा,विद्युत वायर बदलणे, शौचालयाची स्वच्छता, विद्युत सुधारणा,झाडे ,फुले ,वेली यासारखे आधुनिकतेचे स्वरूप आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. पोलीस हा उपक्रम जनतेच्या माध्यमातून राबवित आहे.

यासाठी पूर्व प्रादेशिक विभागाचे अप्पर पोलीस आयुक्त महेश पाटील, परिमंडळ ७ चे पोलीस उपायुक्त विजयकांत सागर तसेच घाटकोपर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त शैलेश पासलवर यांच्या मार्गदर्शनाखाली घाटकोपर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते यांनी पोलिस ठाण्याच्या संपूर्ण इमारतीचा आणि परिसराचा चेहरा बदलण्यासाठी पुढाकार घेतला आहे. आणि सध्या हे काम सुरू झाले असून लवकरच पूर्ण होणार आहे. नागरिक तक्रारी घेऊन



येतात तो ठाणे अंमलदार कक्षही आधुनिक केला जात असल्याने यापुढे त्याचे स्वरूप बदलणार आहे. त्यामुळे संपूर्ण पोलीस ठाण्याचा चेहरामोहरा बदलला जाणार असल्याचे काळदाते यांनी सांगितले.

# बीड जिल्ह्यातील लॅब तंत्रज्ञांच्या पहिल्या सीएमईचे अंबाजोगाई येथे आयोजन



**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

असोसिएशन ऑफ क्लिनिकल लॅबोरेटरी ॲनालिस्टस ॲंड प्रॅक्टिशनर्स या संघटनेच्या माध्यमातून जिल्ह्याचे उपाध्यक्ष विश्वास चोबे यांच्या पुढाकाराने बीड जिल्ह्यातील पहिली सीएमई अंबाजोगाई येथे नुकतीच यशस्विरित्या आयोजित करण्यात आली होती.या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून स्वाराती रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर अंबाजोगाई आयएमएचे अध्यक्ष डॉ.एन.बी.घुगे, डॉ.राहुल धाकडे, डॉ.विवेक मुळे, डॉ.बालासाहेब लोमटे, डॉ.सुलभा पाटील हे मान्यवर उपस्थित होते. दि.२ मार्च रविवार रोजी आयोजित सीएमई व नवनिर्वाचित सदस्य आणि पदाधिकारी यांचा बीड जिल्हा शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीड जिल्हाध्यक्ष दामोधर संदीकर यांनी केले. त्यांनी बीड जिल्ह्यातील पहिली सीएमई अंबाजोगाई येथे आयोजित करण्यामागची पार्श्वभूमी व विधायक हेतू आहे असे नमूद केले. यावेळी बोलताना डॉ.राहुल धाकडे यांनी 'असोसिएशन ऑफ क्लिनिकल लॅबोरेटरी ॲनालिस्टस ॲंड प्रॅक्टिशनर्स' या संघटनेचे उद्दिष्ट सांगताना महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिल कशा पद्धतीने आली याचा आवर्जून उल्लेख केला. या ठिकाणी राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या ईडीजीई लॅब्स कंपनीने या कार्यक्रमात डॉ.अमित लोमटे यांनी 'मायक्रो बायोलॉजी' या विषयावर मार्गदर्शन करताना सुलभ आणि सोप्या भाषेतून व्याख्यान दिले.

सांगता समारंभामध्ये एसीएलएपीचे अध्यक्ष प्रशांत गुळेकर (कोकण), सचिव रमेश चौगुले (कोल्हापूर), सहसचिव राजेश गरूड (परभणी), उपाध्यक्ष गणेश बोंढारे (नांदेड) संभाजी पाटील (अध्यक्ष, नांदेड), शंकर काळे (अध्यक्ष, लातूर) हे आवर्जून उपस्थित होते. सीएमईच्या सांगता समारंभामध्ये मार्गदर्शन करताना महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रशांत गुळेकर यांनी महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिल या शिवाय लॅबोरेटरी कायदे, बायो वेस्टेज याची आवश्यकता का आहे ? आणि आपण पुढील कायदेशीर वाटचाल कशी होणार आहे, याबाबतचे परिपूर्ण मार्गदर्शन केलं. तसेच राजेश गरूड यांनी आपल्या सहज सोप्या भाषेमध्ये लॅबोरेटरी चालवताना येणाऱ्या आव्हानांना कसे सामोरे जायचे याचे परिपूर्ण मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन गौरशेटे यांनी केले तर सहभागी उपस्थितांचे आभार बीड जिल्हा उपाध्यक्ष विश्वास चोबे यांनी मानले. बीड जिल्ह्यातील पहिल्या अंबाजोगाई येथे आयोजित सीएमईसाठी संपूर्ण बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातून लातूर, धाराशिव, परभणी आणि नांदेड या जिल्ह्यातून १५० ते २०० तंत्रज्ञांची उपस्थिती होती. एवढा मोठा कार्यक्रम मराठवाड्यात यापूर्वी झालेला नाही अशी चर्चा यावेळी सहभागी तंत्रज्ञांकडून ऐकावयास मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी योगीराज बर्दापूरे, सुरेश पिंपळे, राम मोरे, विश्वास चोबे, दिनेश ढोले पाटील, नितीन काकडे, रईस सय्यद, चंद्रकांत गायकवाड, गणेश कापरे, दिगंबर कदम, अमेर पठाण, राजपाल लोमटे, अजय शिंदे, किरण सरवदे, संतोष खाकरे, सत्तार शेख, महादेव पतंगे, अशोक इंटरपाईजेस यांच्यासह 'असोसिएशन ऑफ क्लिनिकल लॅबोरेटरी ॲनालिस्टस ॲंड प्रॅक्टिशनर्स' या संघटनेच्या बीड जिल्हा व अंबाजोगाई तालुका शाखेच्या वतीने परीश्रम घेण्यात आले.

## दशनाम संस्थान मुंगूसवाडे येथे पत्रकार गोकुळ पवार यांचा सत्कार

### महंत शुक्ल भारती महाराज आणि संतोष महाराज यांची उपस्थिती



**शिरूर कासार | प्रतीनीधी**

उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने शिरूर येथील आदर्श पत्रकार गोकुळ पवार यांना दुहेरी पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा श्री क्षेत्र दशनाम संस्थान,मुंगूसवाडे येथे सत्कार करण्यात आला.या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महंत शुक्ल भारती महाराज हे तर प्रमुख पाहुणे म्हणून संतोष महाराज भारती यांच्यासह माजी सैनिक अशोक गिरी,पोलिस पाटील गोविंद पाटील गाडेकर,श्रावण भारती बाबा विद्यालयाचे प्राचार्य शिवाजी वारे,गहिनीनाथ खेडकर,पत्रकार विजय शिवगजे,चंद्रकांत शर्मा,सतिश मुरकुटे,भारत पानसंबळ,माजी सरपंच प्रल्हाद हिंगे,ग्रामपंचायत सदस्य रामनाथ खेडकर,नारायण बांगर,शंकर खेडकर,सुधाकर चव्हाते,सर्पमित्र महेश औसरमल,प्रतिष्ठीत व्यापारी माधव भांडेकर,प्रकाश भांडेकर,अशोक कातखडे,शहादेव मुळे,नितीन गाडेकर यांची उपस्थिती होती.उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने उत्कृष्ट वार्ता आणि शाश्वत विकास वार्ता ही दोन पुरस्कार मिळाल्याबद्दल पत्रकार गोकुळ पवार यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला मुंगूसवाडे येथील प्रतिष्ठित नागरिक,शिक्षक,आशा स्वयंसेविका,माता भगिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## मराठा सेवा संघाची केज येथे बैठक विविध पदाधिकारी कार्यकारिणी जाहीर



**केज | प्रतिनिधी**

मराठा सेवा संघाची बैठक केज येथे सोमवार रोजी संपन्न झाली. बैठकीचे अध्यक्ष मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नागनाथ जाधव होते. यावेळी विविध पदाधिकाऱ्यांची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवश्री नागनाथ जाधव जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे विष्णू तपसे, हनुमंत घाडगे हनुमंत भोसले, गोविंद सपाटे, राधाताई सपकाळ,हिराबाई शेळके ,गोविंद शिनगारे आदींची उपस्थिती होती येणाऱ्या कालावधीत होणारी जिजाऊ प्रबोधन यात्रा विषयी चर्चा करुन या प्रबोधन यात्रेचे विविध ठिकाणी तालुक्यामध्ये विविध प्रकारे स्वागत, कार्यक्रम घेण्याचे निश्चित करण्यात आले. मराठा सेवा संघ शिवधर्म संस्कार विधी नामदेव तुकोबा विचार कृती प्रणित, क्रांतीसिंह नाना पाटील शिवसेवक जिल्हाध्यक्ष बीड पूर्व साठी योगेश्वर महाराज आंबाड यांची निवड करण्यात आली, किशोर भालेराव यांची तालुका उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. अश्विन टोंपे यांची तालुका उपाध्यक्ष तर तालुका सचिव विष्णू यादव, तालुका कोषाध्यक्ष धनराज इंगोले, तालुका कार्याध्यक्ष शशिकांत जाधव,तालुका संघटक तुषार पाटील, मनोज भोसले केज शहराध्यक्ष, संतोष काका जगदाळे-सदस्य पदी निवड करण्यात यात्रसंगी नूतन पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ पुस्तक नियुक्तीपत्र देऊन स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन युवराज हिरवे यांनी केले आभार विष्णू यादव यांनी मानले. यावेळी विष्णू आबा तपसे बाळासाहेब सोनवणे, मनोज भोसले तालुकाध्यक्ष जयराम देशमुख ,अभय देशमुख, उत्तरेश्वर भोसले,संजय तपसे, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. निवडीबद्दल सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले जात आहे .

## ३७ वर्षानंतर वाळकी मधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा रंगला स्नेह मेळावा

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

वाळकी (ता. नगर) येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयातील सन १९८८ च्या इयत्ता दहावी (एसएससी) च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा शहरात उत्साहात पार पडला. ३७ वर्षानंतर एकत्र आलेल्या मित्र-मैत्रिणींनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. स्नेह मेळाव्यानिमित्ताने एकत्र आलेल्या वर्ग मित्र-मैत्रिणींनी शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, क्रीडा स्पर्धा, वर्गात मिळालेली शिक्षा, स्नेहसंमेलनातील अनेक गोड आठवणी सांगितल्या. माजी विद्यार्थ्यांनी जुन्या मित्रांबरोबर एकच धमाल करुन, आयुष्य घडविणाऱ्या माजी शिक्षकांसमोर नतमस्तक झाले. राज्याच्या विविध भागातून माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी कार्यक्रमासाठी हजर होत्या.

वाळकी मधील रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयातील सन १९८८ च्या इयत्ता दहावी मधील माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन एका व्हाट्सअप ग्रुप तयार केला आहे. या ग्रुपच्या माध्यमातून सर्व जुने सवंगडी एकमेकांच्या संपर्कात असतात. व्हाट्सअपच्या माध्यमातून एकत्र आलेले माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्याच्या कार्यक्रमातून एकवटले होते.कार्यक्रमास उपस्थित तत्कालीन शिक्षकांनी सर्व माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींना नोकरी व्यवसाय करत असताना कुटुंबातील जेष्ठ व्यक्तींशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवावेत, मुलांवर चांगले संस्कार करावेत, समाज हिताची कामे करावी, शरीर प्रकृती चांगली राहण्यासाठी नियमित व्यायाम करण्याचे मौलिक मार्गदर्शन केले. माजी शिक्षिका जाधव मॅडमने यावेळी आपल्या विद्यार्थ्यांसाठी कविता सादर केल्या. तसेच माजी शिक्षकांनी आपल्या माजी विद्यार्थ्यांशी गप्पा मारताना जणू वर्गच भरविला होता. आपल्या लाडक्या शिक्षकांशी देखील विद्यार्थ्यांनी मनमुराद गप्पा मारुन जुन्या आठवणी सांगितल्या. उपस्थित मित्रांनी आपल्या भावना व्यक्त करुन जुन्या चांगल्या-वाईट आठवणीचा इतिहास मांडताना सर्वच भारावले.

## योगेश्वरी शिक्षण संस्था दिपस्तंभ असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी कटिबद्ध आहे

### राज्याचे शिक्षण संचालक महेश पालकर यांचे प्रतिपादन



**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

शतकोत्तर वाटचाल करणारी व शिक्षण क्षेत्रात दिपस्तंभ असणारी योगेश्वरी शिक्षण संस्था परिवर्तनाच्या दिशेने जाताना सामाजिक दायित्व व ज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे मत महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक महेश पालकर यांनी व्यक्त केले.योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने नागापूरकर सभागृहात दि. ४ मार्च मंगळवार रोजी विविध शाळांच्या मुख्याध्यापक तसेच विज्ञान,गणित शिक्षकांच्या एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते. व्यासपीठावर शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकूंद, शिक्षण सहसंचालक डॉ.सतीश सातव, अंजली पालकर, योजना विभागाचे शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, गटशिक्षणाधिकारी सी.आर.शेख, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. योगेश सुरवसे, परभणी येथिल मुख्याध्यापक संघाचे सचिव गणेश शिंदे, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, परभणी येथील महेश पाटील आदी उपस्थित होते. पुढे बोलताना महेश पालकर म्हणाले की, समाजाच्या तळागाळातील विद्यार्थी शिकावा यासाठी १०८ वर्षापासून योगेश्वरी शिक्षण संस्था निष्ठेने, समर्पित भावनेतून कार्य करीत असून हजारो विद्यार्थी विदेशात,देशात विविध स्तरावर कार्यरत आहेत. योगेश्वरी शिक्षण संस्थेने तारांगण प्रकल्पाचा केलेली निर्मिती ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठीची मोठी उपलब्धी असून यातूनच विज्ञानाचा प्रचार व प्रसार होईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकूंद म्हणाले की, योगेश्वरी शिक्षण संस्थेला स्वातंत्र्यपूर्व काळाचा इतिहास असून ही संस्था विद्यार्थी घडविण्याचे केंद्र असून देशाचे वैभव उभे करण्याचे काम या संस्थेतून होते संस्काराचे पोषण करण्यासाठी योगेश्वरी शिक्षण संस्थेसारख्या संस्थांची गरज असून विश्वात होणारे बदल पोहंचविण्याचे काम अशाच संस्थांच्या माध्यमातून होऊ शकते असेही ते म्हणाले. यावेळी शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, महेश पाटील यांनी आपले विचार मांडले. अध्यक्षीय समारोप करताना चंद्रशेखर बर्दापूरकर म्हणाले की,योगेश्वरी शिक्षण संस्था ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असून संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाळे यांनी केलेले दिशादायी कार्य, अविश्रांत परिश्रम,योग्य निर्णय, सर्वांचे सहकार्य यातूनच संस्थेचे विकासात्मक कार्य पुढे जात असल्याचे म्हणाले. मान्यवरांचे स्वागत योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, संचालक, विविध विभागांचे प्रमुख यांच्या वतीने करण्यात आले. तारांगण प्रकल्प, हैदराबाद मुक्ती संग्राम केंद्र याची पाहणी पाहुण्यांनी केली. कार्यक्रमाच्या प्रास्तविकात उपाध्यक्ष गणपत व्यास यांनी केले . कार्यक्रमाचे संचालन प्रा.डॉ.संपदा कुलकर्णी यांनी तर उपस्थितांचे आभार सचिव कमलाकर चौसाळकर यांनी मानले. यावेळी विविध ठिकाणाहून आलेले शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077